# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय हिंगोली
## प्रशासकीय इमारत, नांदेड रोड, हिंगोली.

दुरध्वनी क्र (2456)(221450) फॅक्स क्र.02456-222400 ई-मेल rdc.hingoli 123@gmail.com

---

जा. क्र.2020/गो.शा.2/कार्यालय उपस्थिती/कावी. दिनांक 19.4.2020

संदर्भ :-1. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 25,30,33,34,41 व कलम 51
2. प्रधान सचिव, मदत व पुर्नवसन, म.व वने, मंत्रालय यांचे कडील पत्र दि.5.2.2020
3. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
4. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.2020/डिसी-1/crpc-144/कावी दि.22.3.2020, 25.3.2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.2020/गोशा-1/करोना/कावी दिनांक 23.3.2020,31.3.2020
6. महसुल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे आदेश दिनांक 17 एप्रिल 2020

**आदेश**

**ज्या अर्थी** , आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम 2 (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

**आणि ज्या अर्थी**, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत करोना विषाणु संसर्ग बाधित रुग्णाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने खबरदारीची उपाय योजना म्हणुन संपुर्ण देशभरात दिनांक 25.3.2020 पासुन 14.4.2020 पर्यंत लॉकडाउनचा निर्णय घेण्यात आला होता त्यानुसार संदर्भ क्र.4 व 5 अन्वये जमाव बंदी आदेश लागु करुन संपुर्ण जिल्हयाच्या सिमाबंदी करण्यात आल्या होत्या. तसेच त्या दरम्यान शासनाच्या कार्यालयीन आस्थापनांनी फक्त 5% कर्मचारी यांना रोटेशन पध्दतीने दैनंदीन कामकाज पार पाडण्यासाठी कार्यालयामध्ये बोलावण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

**आणि ज्या अर्थी** कोरोना बाधीत रुग्णाच्या संख्येमध्ये वाढ होत असल्याने शासनाने लॉकडाउनच्या कालावधी मध्ये दिनांक 30.4.2020 पर्यंत वाढ करुन कांही आस्थापनाना दिनांक 20.4.2020 पासुन अटी व शर्तीच्या अधिन राहुन सुरु करण्याची परवानगी संदर्भ क्र. 6 च्या आदेशान्वये दिलेली आहे. तसेच शासकीय / निमशासकीय / स्थानीक स्वराज्य संस्था ची कार्यालये देखील खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सुरु करण्याची परवानगी दिलेली आहे.

**त्याअर्थी** मी **रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, हिंगोली** दिनांक 20.4.2020 पासुन खालील अटी व शर्ती, राज्य शासनाच्या वेळोवेळी अद्यावत मार्गदर्शक सुचना व नियमाचे काटेकोर पालन करुन कार्यालये सुरु करण्यासाठी आदेश निर्गमीत करीत आहे.

1. पोलीस, होमगार्ड, नागरी सुरक्षा, अग्नीशमन, अत्यावश्यक सेवा, आपत्ती व्यवस्थापन, कारागृह आणि नगर परिषदा / नगर पंचायती / स्थानिक स्वराज्य संस्था ई. च्या सेवा कोणत्याही प्रतिबंधा शिवाय शासनाच्या सुरक्षीततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करुन सुरु ठेवता येतील.
2. सर्व राज्य शासनाचे विभागांनी फक्त 10% कर्मचारी यांना रोटेशन पध्दतीने कामावर येण्यासाठी उपथिती अनिवार्य करुन, त्यांच्या स्तरावरुन आदेश निर्गमीत करुन कार्यालयीन

Scanned by CamScanner

कामकाज, लोकांची गैरसोय होउ नये या दृष्टीने सुरु करावेत. तसेच कर्मचारी वर्गाची सेवा 10% पेक्षा अधिक करण्याचे अधिकार संबंधीत कार्यालयाच्या कामकाजाचा भार लक्षात घेउन संबंधीत कार्यालय प्रमुखांना असतील.

3. कार्यालय प्रमुखांनी दिनांक 20.4.2020 पासुन कार्यालयाची सुरुवात करतांना संपुर्ण कार्यालयाचे सॅनिटायजेशन करुनच सुरुवात करावी.

4. कार्यालयाच्या मुख्य प्रवेशव्दारावर अधिकारी / कर्मचारी / अभ्यागतांसाठी सॅनेटायझरची सोय उपलब्ध करुन दयावी. व प्रत्येक अधिकारी / कर्मचारी व अभ्यागतांनी संपुर्णवेळ मास्कचा आवश्य वापर करावा.

5. शासनाने ठरवुन दिलेल्या अंतराच्या परीसीमाचे तंतोतंत पालन करुन कार्यालयामध्ये व कार्यालयाच्या परीसरामध्ये **सामाजीक अंतराचे ( Social Distance )** पालन करण्यात यावे व जागोजागी सुरक्षीततेच्या उपाययोजनांचे माहिती फलक लावण्यात यावेत.

6. कार्यालयाच्या परीसरामध्ये अधिकारी / कर्मचारी / अभ्यागतांसाठी पिण्याच्या पाण्याची व हात धुण्याच्या पाण्याची व्यवस्था योग्य ठिकाणी करण्यात यावी व पाणी उपलब्ध राहील याची स्वत: कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

7. दररोज कार्यालयामध्ये येणा-या अधिकारी / कर्मचारी / अभ्यागतांची तपासणी थर्मल गन च्या सहाय्याने करण्यात यावी या साठी आपल्या कार्यालयाच्या निधी मधुन थर्मल गन उपलब्ध करुन घ्यावे किंवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे कडे मागणी नोंदवावी.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समुह आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरित

**( रुचेश जयवंशी )**

**जिल्हाधिकारी हिंगोली**

1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, हिंगोली यांना माहितीस्तव व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
3. पोलीस अधिक्षक, हिंगोली यांना माहितीस्तव व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
4. जिल्हा शल्य चिकीत्सक, हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
5. उपविभागीय अधिकारी हिंगोली, कळमनुरी, वसमत यांना व आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
6. तहसिलदार हिंगोली/कळमनुरी/वसमत/सेनगाव/औंढा ना., यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव.
7. सर्व कार्यालय प्रमुख जिल्हा हिंगोली यांना आवश्यकत्या कार्यवाहीस्तव देउन कळविण्यात येते की, सदर आदेशातील अटी व शर्तीनुसार कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करण्यास्तव.

**( रुचेश जयवंशी )**

**जिल्हाधिकारी हिंगोली**

Scanned by CamScanner